# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

## पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### ७ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर २०१९ सकाळी ८.०० ते ८.०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ७ सप्टेंबर २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | ७ सप्टेंबर २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ६६.४ | २३२५.० | २२०३ | १०५.५४% | १७३२.० | ७७.५३% |
| सांताक्रुझ | ११९.० | ३२६५.१ | २५१४ | १२९.८८% | २१९४.२ | ८७.२४% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ७ सप्टेंबर २०१९पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ११९.९९ | २४५६.१९ | १११.४९% | १२१.६४% |
| पूर्व उपनगरे | ११८.३० | ३१९९.६६ | १२२.२९% | |
| पश्चिम उपनगरे | १२८.८४ | २९४८.९४ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २८.४ | २४.५ |
| सांताक्रुझ | २९.८ | २३.६ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०८.०९.२०१९ | सकाळी ८:२२ | ३.३७ मी. | ०८.०९.२०१९ | दुपारी २:५१ | २.२९ मी. |
| ०८.०९.२०१९ | रात्रौ ८:०६ | २.९० मी. | ०९.०९.२०१९ | मध्यरात्री २:१४ | १.५५ मी. |
| ०९.०९.२०१९ | सकाळी ९:२७ | ३.५४ मी. | ०९.०९.२०१९ | दुपारी ३:५२ | २.०७ मी. |

५. हवामान अंदाज : कुलाबा वेधशाळेने पुढिल २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात आकाश अंशत: ढगाळ राहून काहि ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

६. **पाणी साचणे : शहरात** :हिंदमाता, सायन रोड नं. २४, प्रतिक्षा नगर सायन, अॅन्टॉप हिल, गांधीमार्केट
**पूर्व उपनगरात** :शेल कॉलनी चेंबूर, कुर्ला, चुन्नाभट्टी
**पश्चिम उपनगरात** : साईनाथ सबवे, नॅशनल कॉलेज बांद्रा (प),मोतीलाल नगर, गोरेगांव, ठाकुर गांव, कांदिवली या ठिकाणी पाणी साचण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. पाण्याचा निचरा करण्याची कार्यवाही सुरु आहे. दिनांक ०७.०९.२०१९ च्या सायंकाळ पर्यंत सर्व ठिकाणच्या पाण्याचा निचरा झाला.

७. **घर पडल्याच्या तक्रारी**: शहरात १, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात ३ अशा एकुण ६ ठिकाणी घराचा /भिंतीचा भाग पडल्याच्या तक्रारी नागरिकांकडून व यंत्रणांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबधित विभाग कार्यालयांना व यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. सदर घटनांनमध्ये कुणीही जखमी नाही.

८. **दरड कोसळणे: निरंक**

९. **शॉर्टसर्किट**: शहरात ६, पूर्व उपनगरात ५ व पश्चिम उपनगरात १६ अशा एकूण २७ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या. मार नाही.

१०. **झाडे/फांद्या पडण्याच्या नागरिकांकडून प्राप्त तक्रारी**: शहरात ५, पूर्व उपनगरात ३ व पश्चिम उपनगरात १४ अशा एकूण २२ ठिकाणी झाडे पडण्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागास पडताळणीसाठी व पुढिल कार्यवाहीकरीता कळविण्यात आल्या आहेत. उपरोक्त तक्रारीपैकी पश्चिम उपनगरात दि.०७.०९.२०१९ रोजी सायं. ४:२१ वा वैद्यकीय अधिकारी (कुपर रुग्णालय) यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार, रुम. नं.३, नानाी बंगलो, चॅपल लेन, सांताक्रुझ (प) या ठिकाणी झाडाची फांदी पडून श्रीम. विमल लाला, वय ६५ वर्षे हि महिला जखमी झाली. सदर महिलेच्या डोक्याला मार असून, कुपर रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरु आहे. महिलेची प्रकृती स्थिर आहे.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**
- **पश्चिम रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे.
- **मध्य रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे.
- **हार्बर रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे.
- **बीईएसटी** : वाहतूक सुरळीत सुरु आहे.

१२. **विशेष माहिती**: दिनांक ०७.०९.२०१९ रोजी, मुंबई शहर व उपनगरात सहा दिवसांच्या गणेश मुर्तींच्या विसर्जनानिमीत्त सार्वजनिक ८५४, घरगुती ४१३०६ व गौरी ४९५० अशा एकुण ४७११० मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. त्यापैकी सार्वजनिक ६४, घरगुती ६२९७ व गौरी ६७९ अशा एकूण ७०४० गणेश मुर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले.